
पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली
विश्रामबाग सांगली -४१६ ४१५
दूरध्वनी (०२३३) २६७२३२३फॅक्स २६७२१००
E-mail - sp.sangli@mahapolice.gov.in



क्र.पशा-७/ पुनःप्रक्षेपण केंद्र (OFC) यंत्रणा/जाहिरात/२०२६ सांगली, दि. ३०.१०.२०२६

तात्काळ/महत्वाचे

विषय — पुनःप्रक्षेपण केंद्र Optical Fiber Connectivity (OFC) यंत्रणा सुस्थितीत ठेवण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचा वार्षिक सेवासंविधा करार करणेकामी दरपत्रके मागविणे व जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

....

उपरोक्त विषयान्वये पुनःप्रक्षेपण केंद्र Optical Fiber Connectivity (OFC) यंत्रणा सुस्थितीत ठेवण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचा वार्षिक सेवाकरार करणेच्या अनुषंगाने मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी वार्षिक सेवासंविधा करार करणेच्या अनुषंगाने सांगली जिल्हा पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळावर सोबत जोडण्यात आलेली जाहीर दरपत्रक सुचना दिनांक ३१.१०.२०२६ ते दिनांक ०९.११.२०२६ रोजी सायंकाळी ०७.०० पर्यंत असे १० दिवस प्रसिध्द करण्यात यावी. तदनंतर सदरची जाहीरात वेबसाईटवरून काढून टाकण्यात यावी.

सदरची जाहीर दरपत्रक सुचना विहीत वेळेत प्रसिध्द करण्याची दक्षता घेण्यात यावी.

पोलीस अधीक्षक
यांचे आदेशान्वये

(सुनिल सातपुते)
कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली

प्रति,

प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव

१. प्रमुख लिपीक नोंदणी शाखा

२/- दिनांक ३१.१०.२०२६ ते दिनांक ०९.११.२०२६ या कालावधीत उपरोक्त विषयास अनुसरून प्राप्त झालेली दरपत्रके पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश विभाग यांचेकडे पाठविण्यात यावीत. तदनंतर दरपत्रके स्वीकारण्यात येवू नयेत.

२. पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश विभाग

२/- वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने मुदतीत प्राप्त होणारे दरपत्रके आपले अहवालासह या कार्यालयास सादर करण्यात यावीत.

प्रत

जाहीर दरपत्रक सुचना

पुनःप्रक्षेपण केंद्र Optical Fiber Connectivity (OFC)

WWW.sangli police.gov.in या संकेतस्थळावर खालीलप्रमाणे जाहीरात देण्यात येत आहे.

सांगली जिल्हा पोलीस घटकातंर्गत पुनःप्रक्षेपण केंद्र Optical Fiber Connectivity (OFC) सुस्थितीत ठेवून कार्यरत ठेवण्याकरीता पुनःप्रक्षेपण केंद्र Optical Fiber Connectivity (OFC) संबंधीची यंत्रसामुग्रीची देखभाल दुरुस्तीचा वार्षिक सेवासंविधा करार (Non Comprehensive annual maintenance contract) करणेच्या अनुषंगाने सदरची सुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तालुका वाहनीकरीता पळशी, आरेवाडी व पन्हाळा असे एकुण ०३ ठिकाणे व शहर वाहनीकरीता बीएसएनएल ऑफिस सांगली व मिरज पोलीस ठाणे असे एकुण ०२ पुनःप्रक्षेपण केंद्र यांची एकमेमांसोबत जोडणी करणेकामी मायक्रोवेव्ह लिंकची उभारणी करणेत आली होती. परंतु सदरची यंत्रणा नादुरुस्ती झाली असून दुरुस्ती होणे शक्य नसलेने पर्यायी यंत्रणा म्हणून सद्दस्थितीमध्ये रेडिओ सेअ Back to Back Set RF Patching मार्फत जोडले आहेत. वातावरणातील बदलामुळे बऱ्याच वेळा वाहिनीवर आवाजाची स्पष्टतः कायम राहत नाही. त्यामुळे सदर यंत्रणा अद्यावत करणेकामी उपरोक्त नमुद पुनःप्रक्षेपण केंद्र Optical Fiber Connectivity (OFC) ने जोडणेबाबत सेवासंविधा करार करणेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अटी व शर्ती राहतील.

०१. पुरवठादाराचे स्वःताचे वर्कशॉप / दुकान असणे आवश्यक आहे त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.

०२. पुरवठादाराचे पॅनकार्ड / जीएसटी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

०३. पुरवठादारास वरीलप्रमाणे नमूद कामाचा कमीत-कमी ०८ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक असून त्याबाबत काही कागदपत्रे किंवा करार असल्यास जोडण्यात यावे.

०४. पुनःप्रक्षेपण केंद्र Optical Fiber Connectivity (OFC) सहयंत्रणा ना-दुरुस्त झाल्यास ४८ तासात दुरुस्तीची कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

०५. पुनःप्रक्षेपण केंद्र Optical Fiber Connectivity (OFC) व इतर साहित्य दुरुस्तीसाठी लागणारे अत्याधुनिक मशनरी असणे आवश्यक आहे. OFC व इतर साहित्य दुरुस्तीचे Onsite कामकाज करणेचे आहे दुरुस्तीकरीता आवश्यक साहित्य/शिडी इत्यादि साहित्य स्वतःचे असावे या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही तसेच त्यासाठी वेगळा खर्च देण्यात येणार नाही.

०६. एखादे नादुरुस्त साहित्य दुरुस्त होण्यापलीकडे असेल तर ते साहित्य रिपोर्टसह या कार्यालयास पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश विभाग यांचा अहवाल व प्रमाणपत्रासह जमा करणेचे आहे व या कार्यालयाची परवानगी घेतल्यानंतर नवीन उभारणी करणेची आहे.

०७. दुरुस्तीची देयके ही शासनाकडून जसे अनुदान प्राप्त होईल त्याप्रमाणे प्रदान केली जातील.

०८. केलेल्या कामाचा दर्जा उच्च व उत्तम प्रतीचा असला पाहीजे.

०९. दुरुस्तीसाठी अथवा सुटेभाग खरेदीसाठी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१०. वरील अटींची पुर्तता करीत नसतील अशा पुरवठादारांना अपात्र ठरविण्यात येईल.

११. पुनःप्रक्षेपण केंद्र Optical Fiber Connectivity (OFC) चे Feed/Footage सांगली जिल्हा पोलीस विभागा व्यतिरिक्त इतरत्र कोठेही देणेचे नाही याबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक असून त्याबाबत हमीपत्रे देणे क्रमप्राप्त राहील.

१२. दरपत्रक प्रक्रियेस मुदतवाढ अथवा कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार **पोलीस अधीक्षक सांगली** यांनी राखून ठेवले आहेत.

सोबत जोडले नमूद यादीप्रमाणे आवश्यक यंत्रसामुग्रीचे दरपत्रक दिनांक ०९.११.२०२६ अखेर सादर करणे बंधनकारक आहे. तदनंतर येणारी दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.

(सुनिल सातपुते)
कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली

Optical Fiber Connectivity (OFC)

Sr. No.	Item Description	Qty.	PERIOD	AMOUNT
01	Dual/Multi-WAN Load Balancer Router One-time Device Chargers For Palshi, Panhala, Sangli, Miraj, Arewadi	05	1 YEAR	
02	High-Speed Internet Service Charges Yearly Recurring Plan per location via Feasible provider (Airtel/Jio/Tata/Local ISP)	05 RPTR Station	1 YEAR	
03	Cloud –Based VPN Router Tunnel Maintenanace Yearly Charges for 24X7 Monitoring, Static Routing, Encryption & Tunnel Maintenanace.	05 RPTR Station	1 YEAR	
04	Base Network Installation & Setup Charges Standard Last-Mile Installation up to 1KM per site.	05 RPTR Station	1 YEAR	

(सुनिल सातपुते)
कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली